# मराठीचा वारसा जपणार 'ऋतुरंग'

## पोदार कॉलेजमध्ये आजपासून फेस्टिव्हल

अभिषेक तेली

**मुंबई :** 'मराठी असे आमुची मायबोली' असे अभिमानाने म्हटले जात असले, तरी मराठी भाषेची अनेकदा उपेक्षाच होत असल्याचे चित्र पाहायला मिळते. आपल्या मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी 'वारसा माय मराठीचा, साज संस्कृतीचा' या संकल्पनेवर आधारित एक फेस्टिव्हल माटुंग्याच्या पोदार कॉलेजमध्ये २३ सप्टेंबरपासून चार दिवस साजरा होत आहे. कॉलेजच्या मुद्रा मराठी वाङ्मय मंडळातर्फे होणाऱ्या या आंतरमहाविद्यालयीन फेस्टिव्हलचे नाव 'ऋतुरंग' असे आहे. झूम ॲपच्या माध्यमातून आभासी पद्धतीने साजऱ्या होणाऱ्या या फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर आहे.

यंदा मुंबई व आसपासच्या परिसरातील २५हून अधिक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी

महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

यामध्ये आपला सहभाग नोंदवला आहे. 'ऋतुरंग'मध्ये स्पर्धकांसाठी विविध इव्हेंट्सची मेजवानी असेल. 'रणांगण'मध्ये स्पर्धकांना मराठी भाषा आणि महाराष्ट्राशी संबंधित केबीसी पद्धतीने प्रश्नमंजुषा खेळायची आहे. 'नृत्यलंकार'मध्ये प्राथमिक फेरीत बैठकीची तर अंतिम फेरीत कोणतीही ठसकेबाज अशी लावणी सादर करायची आहे. शब्द आणि लेखणीवर प्रभुत्व असणाऱ्यांसाठी 'पत्रास कारण की', कॅमेऱ्यातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवण्यासाठी फोटोग्राफी, पौराणिक कथा शास्त्रीय नृत्यातून सादर करण्यासाठी नृत्यनाट्य, एकाच रागातील तीन गाणी समूह पद्धतीने सादर करण्यासाठी 'स्वरगंध' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्या स्पर्धकांना ई - प्रशस्तीपत्रक, ट्रॉफी, रोख रक्कम आणि गिफ्ट हॅम्पर देण्यात येईल. २६ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या फेस्टसाठी कॉलेजच्या प्रिन्सिपल डॉ. शोभना वासुदेवन, मराठी भाषा विभागप्रमुख स्वाती बांगर यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

> **विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा ऋतुरंग हा एक जुना, मराठमोळा महोत्सव आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा वारसा जपण्याचा आणि विविध इव्हेंट्सच्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रसार करण्याचा प्रयत्न आम्ही यातून केला आहे.**
>
> **- प्रथमेश दोंड,** ऋतुरंग प्रमुख

### मिस्टर अँड मिस ऋतुरंग

'मिस्टर अँड मिस ऋतुरंग' हा या फेस्टिव्हलमधील मुख्य इव्हेंट असून तो दोन फेऱ्यांमध्ये पार पडेल. प्राथमिक फेरीत विद्यार्थ्यांना मराठीसह महाराष्ट्रातल्या कोणत्याही बोलीभाषेत स्वतःची ओळख करून द्यायची आहे. त्याचसोबत परीक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याबरोबरच इमोजीद्वारे चित्रपट, नाटकाचे नाव किंवा गाणे ओळखायचे आहे. तर अंतिम फेरीत विद्यार्थ्यांना आपल्या परिचयासह स्वतःमधील कलागुण सादर करायचे आहेत. या इव्हेंटमधील विजेत्यांना खास डिझाइन केलेले ऋतुरंगचा लोगो असलेले चांदीचे बिस्कीट देण्यात येणार आहे.